फार्मास्युटीक्स शाखेत सचिन सनेर याने ७७ टक्के गुण मिळवून उमवित प्रथम क्रमांक, प्रशांत राजेंद्र महाजन याने ७५.३८ टक्के गुण प्राप्त करुन द्वितीय तर रोहिणी गोविंद मदने हिने ७४.०८ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. फार्माकोलॉजी शाखेत हेमंतकुमार जाधव याने ७३ टक्के गुण मिळवित उमवित प्रथम क्रमांक, घनशाम चौधरी याने ६८.०८ टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळविला. त्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी शिक्षणमंत्री आ.अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, प्राचार्य डॉ.संजय सुराणा, पदव्युत्तर विभागाचे उपप्राचार्य डॉ.अतूल शिरखेडकर, पदवी विभागाचे उपप्राचार्य डॉ.पी.एच.पाटील, सर्व प्राध्यापक यांनी कौतुक केले.

| | |
|---|---|
| Subject | "Result News " News |
| Publication | "Punyanagari" News Paper |
| Date | 22.12.2014 |
| Page No. | 03,Dhule, Gramin, Vruttaved |

देशदूत

# आर.सी.पटेल एम.फार्मसी कॉलेजच्या दोन विद्यार्थ्यांना सुवर्णपदके

शिरपूर, दि.२१ (प्रतिनिधी)-



शिरपूर येथील आर.सी.पटेल एम.फार्मसी कॉलेजचा निकाल जाहीर झाला असून चार विद्यार्थ्यांनी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात प्रथम क्रमांक पटकावला असून दोन विद्यार्थ्यांनी सुवर्णपदके पटकावली आहेत.

क्वॉलीटी अॅश्युरन्स शाखेतून दिपक लक्ष्मण रोकडे याने ७७.३८ टक्के गुण प्राप्त करून उमवित प्रथम क्रमांक पटकावून तो सुवर्णपदकाचा मानकरी ठरला आहे. तुमी युवराज ठोंबरे हीने ७१.३८ टक्के गुण प्राप्त करून उमवित द्वितीय क्रमांक मिळविला आहे. निकीता काळे हीने ७०.६९ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला.

फार्मास्युटीकल केमिस्ट्री शाखेत जमीर खान याने ७७.३१ टक्के गुण मिळवून उमवित प्रथम क्रमांक प्राप्त केला असून सुवर्णपदक मिळविले. सागर अशोक शिंदे हीने ७१.७१ टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक, चेतन छाजेड याने ६८.४० टक्के गुण प्राप्त करून उमवित तृतीय क्रमांक मिळविला.

फार्मास्युटीक्स शाखेत सचिन सनेर याने ७७ टक्के गुण मिळवून उमवित प्रथम क्रमांक, प्रशांत राजेंद्र महाजन याने ७५.३८ टक्के गुण प्राप्त करून द्वितीय तर रोहीणी गोविंद मदने हीने ७४.०८ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला.

फार्माकोलॉजी शाखेत हेमंतकुमार जाधव याने ७३ टक्के गुण मिळवित उमवित प्रथम क्रमांक, घनशाम चौधरी याने ६८.०८ टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळविला.

त्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी शिक्षणमंत्री आ.अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भुपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, प्राचार्य डॉ.संजय सुराणा, पदव्युत्तर विभागाचे उपप्राचार्य डॉ.अतुल शिरखेडकर, पदवी विभागांचे उपप्राचार्य डॉ.पी.एच.पाटील आदिंनी अभिनंदन केले आहे.

| | |
|---|---|
| **Subject** | "Result News " News |
| **Publication** | "Deshdoot" News Paper |
| **Date** | 22.12.2014 |
| **Page No.** | 02,Dhule, News |

पुण्य नगरी

# शिल्पा काळे सुवर्णपदकाची मानकरी



शिरपूर : येथील एच.आर.पटेल एम.फार्मसी कॉलेजने निकालात उज्वल यशाची परंपरा कायम राखली असून कॉलेजची विद्यार्थिनी शिल्पा अशोक काळे हीने उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात प्रथम क्रमांक पटकावला असून ती सुवर्णपदकाची मानकरी ठरली आहे. शिल्पा काळे हीने बायोफार्मास्यूटीक्स विषयात ६८.९२ टक्के गुण मिळवून उमवित प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिला महाविद्यालयाच्या उपप्राचार्या सौ.एस.डी.पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

| | |
|---|---|
| **Subject** | "Result News " News |
| **Publication** | "Punyanagari" News Paper |
| **Date** | 24.12.2014 |
| **Page No.** | 02,Dhule, News |

पुण्य नगरी

पुण्य नगरी सोमवार, १२ जानेवारी २०१५

क्या सिया शी को डे

# एच. आर. पटेल फार्मसीत सिकलसेल तपासणी शिबिर



शिरपूर : शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलीत एच. आर. पटेल इन्स्टीट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्चतर्फे राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत एक दिवसीय मोफत सिकलसेल चाचणी शिबिर घेण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन उपप्राचार्य सविता डी. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी आर. सी. पटेल पदविका फार्मसीचे प्राचार्य डॉ. नितीन हासवाणी, तालुका सिकलसेल कार्यक्रम समन्वयक ऋषीराज महाजन, प्रयोगशाळा तंत्रज्ञ पंकज चव्हाण, प्रयोगशाळा सहाय्यक विलास ठाकरे, प्रा. डी. डी. पाटील उपस्थित होते. शिबिरात एकूण ८० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यांच्या रक्ताची सिकलसेल चाचणी करण्यात आली. सिकलसेल हा अनुवंशीक आजार असून समाजात याविषयी जनजागृती करणे गरजेचे आहे. या आजाराने ग्रस्त असलेल्या रुग्णांना हातपाय, सांधे दुखणे, सुज येणे, थकवा येणे इ. लक्षणे जाणवतात. आजाराबद्दलचे समुपदेशन करतांना ऋषीराज महाराज यांनी आजाराने ग्रस्त असलेल्या रुग्णांसाठी उपलब्ध असलेल्या शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. प्रा. डी. डी. पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले. त्यांनी आजाराची माहीती, लक्षणे, रुग्णांनी घ्यावयाची काळजी याविषयी मार्गदर्शन केले. आभार प्रा. प्रफुल्ल निनावे यांनी मानले. पंकज चव्हाण व विलास ठाकरे उपस्थित होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. बारी, पंचायत समिती तालुका आरोग्य अधिकारी डॉ. विशाल पाटील, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. डी. एन. वाघ यांचे मार्गदर्शन लाभले. संस्था अध्यक्ष आ. अमरिशभाई पटेल, नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपकार्याध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक डॉ. के बी. पाटील, प्राचार्य डॉ. एस. बी. बारी यांनी समाधान व्यक्त केले.

| | |
|---|---|
| **Subject** | "Medical Camp " News |
| **Publication** | "Punyanagari" News Paper |
| **Date** | 12.01.2015 |
| **Page No.** | 08,Classified |



Department of Library,
H. R. Patel Institute of Pharmaceutical
Education & Research, Shirpur

# लोकमत

महाराष्ट्राचा मान...

धुळे, पृष्ठे: १२+४ = १६, किंमत: ₹ ३.००

जळगाव, शनिवार, दि. १७ जानेवारी २०१५



शिरपूर येथे परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी सायली मसाळ सोबत डावीकडून कल्पेश पाटील, डॉ.संजय बारी, डॉ.एस.डी.पाटील, राजगोपाल भंडारी, शशिकांत पाटील, डॉ.संजय सुराणा.

## ग्रामीण भागात आरोग्यसेवा पुरविणे काळाची गरज

### शिरपूर : राज्यस्तरीय परिसंवादात सायली मसाळ यांचे प्रतिपादन

शिरपूर : भारतातील औषध निर्मात्यांनी गुणवत्ता वाढवून जागतिक स्तरावर आपली ओळख निर्माण करावी. ग्रामीण भागात आरोग्य सेवा पुरविणे काळाची गरज आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी पुढे यावे, असे आवाहन राज्याचे औषध व्यवसाय परिषदेच्या निबंधक सायली मसाळ यांनी एकदिवसीय राज्यस्तरीय परिसंवादात मार्गदर्शन करतांना केले.

शिरपुरातील पटेल ऑडिटोरियम येथे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ अंतर्गत एकदिवसीय परिसंवादाचे आयोजन एच.आर. पटेल फॉर्मसी महाविद्यालयात करण्यात आले होते. कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, प्राचार्य संजय बारी, प्राचार्य संजय सुराणा, उपप्राचार्या एस.डी.पाटील, प्रा.कल्पेश पाटील, डॉ.पी.एच. पाटील, डॉ.सी.आर.पाटील, डॉ.एस. एन. गोयल, डॉ. यू. के. पाटील, डॉ. आर. एच.पाटील, प्रा.एस.पी. पाटील उपस्थित होते.

> परिसंवादात राज्यातील २०० पेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी झाले होते. याप्रसंगी ५७ विद्यार्थ्यांनी संशोधन सादर केले. विजेत्या शोधनिबंध सादर करणाऱ्यांना अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकांचे पारितोषिके व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

राज्याचे औषध व्यवसाय परिषदेच्या निबंधक सायली मसाळ म्हणाल्या, महाराष्ट्रात नोंदणीकृत औषधनिर्मात्यांची संख्या इतर राज्यापेक्षा अधिक आहे. मधुमेह, दमा, डेंग्यू, मलेरिया आदी रोगांविषयी रुग्ण माहिती पत्रिका उपलब्ध असून त्याचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

संस्थेचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी व प्रा.शशिकांत पाटील यांनी या वेळी मार्गदर्शन केले. डॉ.वीरेंद्र देसले यांनी उत्तर महाराष्ट्रातील कुपोषण या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.एल. आर. झंवर, प्रा.सी.डी.सोनवणे, प्रास्तविक प्रा.के.आर. पाटील तर आभार प्रदर्शन डॉ.एस.डी. पाटील यांनी केले.

लोकमत धुळे, शनिवार, दि. १७ जानेवारी २०१५ ४

लोकमत

धुळे हॅलो

धुळे, शनिवार, दि. १७ जानेवारी २०१५



ग्रामीण भागात आरोग्य सेवा पुरविण्याची गरज

शिरपूर : भारतातील औषध निर्मात्यांनी गुणवत्ता वाढवून जागतिक स्तरावर आपली ओळख निर्माण करावी. ग्रामीण भागात आरोग्य सेवा पुरविणे काळाची गरज आहे.

पान ४



**Department of Library,**
H. R. Patel Institute of Pharmaceutical
Education & Research, Shirpur

पुण्यनगरी सोमवार, १९ जानेवारी २०१५ ८

कला सिया शी को डे

# ग्रामीण आरोग्य व्यवस्थेवर राज्यस्तरीय चर्चासत्र



शिरपूर : उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व शिरपूर येथील एच.आर.पटेल फार्मसी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय चर्चासत्र झाले.

ग्रामीण भारतातील आरोग्य सेवा व आरोग्य व्यवस्थेच्या पुनर्जीवनाची गरज या विषयावर राज्यस्तरीय चर्चासत्र शिरपूर एज्युकेशन सोसायटी या संस्थेचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी यांच्या अध्यक्षतेखाली स्व.एस.एम.पटेल ऑडीटोरीयम हॉलमध्ये झाले. कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद, मुंबई येथील निबंधक सायली मसाळ यांच्याहस्ते तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.बी.बारी, प्राचार्य डॉ. एस.जे.सुराणा, उपप्राचार्या डॉ.सौ. एस.डी.पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या परिसंवादासाठी अनेक महाविद्यालयांमधून २०० पेक्षा जास्त नोंदणी झाली होती.

याप्रसंगी निबंधक सायली मसाळ यांनी विद्यार्थ्यांना भविष्यातील औषधनिर्माता व त्याची आरोग्य सेवेतील भूमिका याबाबत सविस्तर विवेचन करुन मार्गदर्शन केले. संस्थेचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी यांनी औषधनिर्माण शास्त्रातील विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग ग्रामीण आरोग्य सेवेसाठी करुन विशेष योगदान देण्याचे आवाहन केले. प्राचार्य डॉ. एस.बी.बारी यांनी संस्थेबद्दल तसेच महाविद्यालयातील विविध उपक्रमांबाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे समन्वयक प्रा.के.आर.पाटील यांनी विवेचन केले. सूत्रसंचालन प्रा.एल.आर. झवर व प्रा.सी.डी.सोनवणे यांनी तर आभार उपप्राचार्या डॉ.सौ.एस. डी.पाटील यांनी मानले. याप्रसंगी एसव्हीकेएम संस्थेतील विभाग प्रमुख प्रा.शशिकांत पाटील यांनी माहिती तंत्रज्ञानाचे ग्रामीण आरोग्य सेवेतील योगदान या विषयावर व्याख्यान दिले. शिरपूरचे बालरोग तज्ज्ञ डॉ.वीरेंद्र देसले यांनी उत्तर महाराष्ट्रातील कुपोषण याबाबत विवेचन केले.

महाविद्यालयातर्फे या राज्यस्तरीय परिसंवादाप्रसंगी पोस्टर प्रदर्शन करण्यात आले. अनेक महाविद्यालयाच्या ५७ विद्यार्थ्यांनी संशोधन सादर केले. डॉ. पी.एच.पाटील, डॉ.सी.आर.पाटील, डॉ. एस.एन.गोयल, डॉ.यु.के.पाटील, डॉ.आर.एच.पाटील, प्रा.एस.पी.पाटील यांनी परीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली. यात प्रथम-प्रियंका विजय पाटील व मयुरी दिलीपकुमार शहा, द्वितीय-संचिता संजीव महाले व प्रीती बाजीराव महाले, तृतीय-अभिनव शहा व नवानी सिरोया यांना बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत संस्थेचे अध्यक्ष आ.अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक डॉ.के.बी.पाटील यांनी कौतुक केले.

| | |
|---|---|
| **Subject** | "Conference " News |
| **Publication** | "Punyanagari" News Paper |
| **Date** | 19.01.2015 |
| **Page No.** | 08,Classified |

धुळे
देशदूत
धुळे NEWS
सोमवार,
दि. १९ जानेवारी २०१५
२

नवी आशा नवी दिशा
देशदूत
मोबाईल न्यूजसाठी mobile.deshdoot.com | www.facebook.com/deshdoot

# एच.आर.पटेल फार्मसी कॉलेजमध्ये राज्यस्तरीय चर्चासत्र

शिरपूर, दि. १८ (प्रतिनिधी)–

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व शिरपूर येथील एच.आर.पटेल फार्मसी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय चर्चासत्र संपन्न झाले.

ग्रामीण भारतातील आरोग्य सेवा व आरोग्य व्यवस्थेच्या पुनर्जीवनाची गरज या विषयावर राज्यस्तरीय चर्चासत्र शिरपूर एज्युकेशन सोसायटी या संस्थेचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी यांच्या अध्यक्षतेखाली स्व.एस.एम.पटेल ऑडीटोरीयम हॉलमध्ये संपन्न झाले. कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद, मुंबई येथील निबंधक सौ.सायली मसाळ यांच्या हस्ते तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.बी.बारी, प्राचार्य डॉ.एस.जे.सुराणा, उपप्राचार्या डॉ.सौ. एस.डी.पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या परीसंवादासाठी अनेक महाविद्यालयांमधून २०० पेक्षा जास्त नोंदणी झाली होती.

याप्रसंगी निबंधक सौ.सायली मसाळ यांनी विद्यार्थ्यांना भविष्यातील औषधनिर्माता व त्याची आरोग्य सेवेतील भूमिका याबाबत सविस्तर विवेचन करुन मार्गदर्शन केले. संस्थेचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी यांनी औषधनिर्माण शास्त्रातील विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग ग्रामीण आरोग्य सेवेसाठी करुन विशेष योगदान देण्याचे आवाहन केले. प्राचार्य डॉ.एस.बी.बारी यांनी संस्थेबद्दल तसेच महाविद्यालयातील विविध उपक्रमांबाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे समन्वयक प्रा.के.आर.पाटील यांनी कार्यक्रमाच्या आयोजनबाबत विवेचन के ले. सूत्रसंचलन प्रा.एल. आर.झवर व प्रा.सी.डी.सोनवणे यांनी तर आभार उपप्राचार्या डॉ.सौ.एस.डी.पाटील यांनी मानले. याप्रसंगी एस.व्ही.के. एम.संस्थेतील विभाग प्रमुख प्रा.शशिकांत पाटील यांनी माहिती तंत्रज्ञानाचे ग्रामीण आरोग्य सेवेतील योगदान या विषयावर व्याख्यान दिले. शिरपूरचे बालरोग तज्ञ डॉ.विरेंद्र देसले यांनी उत्तर महाराष्ट्रातील कुपोषण याबाबत विवेचन केले.



शिरपूर येथील एच.आर.पटेल फार्मसी महाविद्यालयात राज्यस्तरीय चर्चासत्राचे उद्घाटन करतांना संस्थेचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी सोबत औषध व्यवसाय परिषदेच्या निबंधक सौ.सायली मसाळ, प्राचार्य डॉ.एस.बी.बारी, प्राचार्य डॉ. एस.जे.सुराणा, उपप्राचार्या डॉ.सौ.एस.डी.पाटील आदी.

महाविद्यालयातर्फे या राज्यस्तरीय परिसंवादप्रसंगी पोस्टर प्रदर्शन करण्यात आले. अनेक महाविद्यालयाच्या ५७ विद्यार्थ्यांनी संशोधन सादर केले. डॉ. पी.एच.पाटील, डॉ. सी.आर.पाटील, डॉ. एस.एन.गोयल, डॉ. यु.के.पाटील, डॉ.आर.एच.पाटील, प्रा.एस. पी.पाटील यांनी परीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली. यात प्रथम–प्रियंका विजय पाटील व मयुरी दिलीपकुमार शहा, द्वितीय–संचिता संजिव महाले व प्रिती बाजीराव महाले, तृतीय– अभिनव शहा व नवानी सिरोया यांना बक्षिसे देण्यात आले. कार्यक्रमाच्या उत्कृष्ट आयोजनाबाबत संस्थेचे अध्यक्ष आ.अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भुपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक डॉ.के.बी.पाटील यांनी कौतुक केले.

धुळे | सोमवार, दि. १९ जानेवारी २०१५ | वर्ष १९ | अंक ९७ | पाने–१२ | इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.co

धुळे/ नंदुरबार । सोमवार, १९ जानेवारी २०१५ । किंमत ₹ ३

सकाळ

नवे संकल्प, नवी दिशा!

सकाळ
जळगाव, सोमवार,
१९ जानेवारी २०१५
६


# आरोग्यसेवा विस्तारीकरणामुळे विद्यार्थ्यांनी 'अपडेट' राहणे गरजेचे

## सायली मसाळ : शिरपूरला पटेल फार्मसीत 'ग्रामीण आरोग्य सेवा'वर परिसंवाद

**सकाळ वृत्तसेवा**

शिरपूर, ता. १८ : देशातील आरोग्यसेवेची मागणी आणि पुरवठा यात मोठी तफावत असल्याने अनेक रुग्ण उपचारापासून वंचित राहतात. आगामी काळात आरोग्य सेवेच्या विस्तारीकरणात औषधनिर्मात्यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. त्यासाठी औषधनिर्माणशास्त्र शाखेच्या विद्यार्थ्यांनी अधिकाधिक ज्ञान ग्रहण करून अद्ययावत असणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेच्या निबंधक सायली मसाळ यांनी केले.



शिरपूर : एच. आर. पटेल फार्मसी महाविद्यालयात परिसंवादात बोलताना सायली मसाळ. व्यासपीठावर राजगोपाल भंडारी, डॉ. बारी, डॉ. सुराणा, श्रीमती पाटील, के. आर. पाटील आदी.

'उमवि' आणि एच. आर. पटेल फार्मसी महाविद्यालयातर्फे 'ग्रामीण भागातील आरोग्य सेवा व आरोग्य व्यवस्थेच्या पुनरुज्जीवनाची गरज' या विषयावरील चर्चासत्रात त्या बोलत होत्या. शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी अध्यक्षस्थानी होते. प्राचार्य डॉ. एस. बी. बारी, प्राचार्य डॉ. एस. जे. सुराणा, उपप्राचार्या डॉ. एस. डी. पाटील उपस्थित होते. राजगोपाल भंडारी यांनी ग्रामीण आरोग्यसेवेत कुशल कर्मचाऱ्यांची वाणवा असल्याने सरकारी मदत लाभूनही ही यंत्रणा अपयशी ठरत असल्याचे सांगितले. ही उणीव भरून काढण्यासाठी औषधशास्त्रनिर्माण शाखेच्या विद्यार्थ्यांवर मोठी जबाबदारी आहे. त्यामुळे चौफेर ज्ञान संपादन करून समाजसेवा करावी, असे आवाहन त्यांनी केले. एनएमआयएमएस विद्यापीठाचे प्रा. शशिकांत पाटील, बालरोगतज्ज्ञ डॉ. वरिंद्र देसले यांची व्याख्यान झाले. समन्वयक प्रा. के. आर. पाटील यांनी कार्यक्रमाची संकल्पना मांडली. प्रा. एल. आर. सोनवणे व प्रा. सी. डी. सोनवणे यांनी सूत्रसंचलन केले. डॉ. एस. डी. पाटील यांनी आभार मानले.

**पोस्टर सादरीकरण स्पर्धा**

पोस्टर सादरीकरण स्पर्धेत ५७ विद्यार्थी सहभागी झाले. प्रियंका पाटील, मयूरी शाह यांनी प्रथम, सविता महाले व प्रीती महाले यांनी द्वितीय, तर अभिनव शहा व नवानी सिरोया यांनी तृतीय क्रमांक मिळवला. डॉ.पी. एच. पाटील, डॉ. सी. आर. पाटील, डॉ. एस. एन. गोयल, डॉ. यू. के. पाटील, डॉ. आर. एच. पाटील, प्रा. एस. पी. पाटील यांनी परीक्षण केले.

ई पेपर : epunyanagari.com

पुण्य नगरी

धुळे-नंदुरबार, सोमवार, १९ जानेवारी २०१५ — वर्ष : १३, अंक : १५४, पाने : १२+४=१६, किंमत : ४ रुपये

पुण्यनगरी — सोमवार, १९ जानेवारी २०१५ — ८

कलासिराशीकोडे


# ग्रामीण आरोग्य व्यवस्थेवर राज्यस्तरीय चर्चासत्र



शिरपूर : उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व शिरपूर येथील एच.आर.पटेल फार्मसी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय चर्चासत्र झाले.

ग्रामीण भारतातील आरोग्य सेवा व आरोग्य व्यवस्थेच्या पुनर्तोलनाची गरज या विषयावर राज्यस्तरीय चर्चासत्र शिरपूर एज्युकेशन सोसायटी या संस्थेचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी यांच्या अध्यक्षतेखाली स्व.एस.एम.पटेल ऑडीटोरीयम हॉलमध्ये झाले. कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद, मुंबई येथील निबंधक सायली मसाळ यांच्याहस्ते तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.बी.बारी, प्राचार्य डॉ. एस.जे.सुराणा, उपप्राचार्या डॉ.सी. एस.डी.पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या परिसंवादासाठी अनेक महाविद्यालयांमधून २०० पेक्षा जास्त नोंदणी झाली होती.

याप्रसंगी निबंधक सायली मसाळ यांनी विद्यार्थ्यांना भविष्यातील औषधनिर्माता व त्याची आरोग्य सेवेतील भूमिका याबाबत सविस्तर विवेचन करून मार्गदर्शन केले. संस्थेचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी यांनी औषधनिर्माण शास्त्रातील विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग ग्रामीण आरोग्य सेवेसाठी करून विशेष योगदान देण्याचे आवाहन केले. प्राचार्य डॉ. एस.बी.बारी यांनी संशोधनात्मक ... महाविद्यालयातील विविध उपक्रमांबाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे समन्वयक प्रा.के.आर.पाटील यांनी विवेचन केले. सूत्रसंचालन प्रा.एल.आर. झवर व प्रा.सी.डी.सोनवणे यांनी तर आभार उपप्राचार्या डॉ.सी.एस. डी.पाटील यांनी मानले. याप्रसंगी एसव्हीकेएम संस्थेतील विभाग प्रमुख प्रा.शशिकांत पाटील यांनी माहिती तंत्रज्ञानाचे ग्रामीण आरोग्य सेवेतील योगदान या विषयावर व्याख्यान दिले. शिरपूरचे बालरोग तज्ज्ञ डॉ.वीरेंद्र देसले यांनी उत्तर महाराष्ट्रातील कुपोषण याबाबत विवेचन केले.

महाविद्यालयातर्फे या राज्यस्तरीय परिसंवादाप्रसंगी पोस्टर प्रदर्शन करण्यात आले. अनेक महाविद्यालयाच्या ५७ विद्यार्थ्यांनी संशोधन सादर केले. डॉ. पी.एच.पाटील, डॉ.सी.आर.पाटील, डॉ. एस.एन.गोयल, डॉ.यु.के.पाटील, डॉ.आर.एच.पाटील, प्रा.एस.पी.पाटील यांनी परीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली. यात प्रथम-प्रियंका विजय पाटील व मधुरी दिलीपकुमार शहा, द्वितीय-संधिता संजीव महाले व प्रीती बाजीराव महाले, तृतीय-अभिनव शहा व नवानी सिरोया यांना बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत संस्थेचे अध्यक्ष आ.अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक डॉ.के.बी.पाटील यांनी कौतुक केले.

लोकमत

# धुळे जिल्ह्यातील १६ खेळाडूंना राष्ट्रीय क्रीडा शिष्यवृत्ती

धुळे : राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत २०१३-१४ या वर्षात प्रावीण्य मिळविलेल्या व सहभागी झालेल्या खेळाडूंना ऑनलाइन शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. या शिष्यवृत्तीसाठी धुळे जिल्ह्यातील १६ खेळाडू पात्र ठरले आहेत. यापैकी तिघांना विजेतेपदाची तर एका विद्यार्थिनीला राष्ट्रीय उपविजेतेपदाची शिष्यवृत्ती मिळणार आहे. इतर १२ खेळाडू सहभाग शिष्यवृत्तीसाठी पात्र आहेत.

शिष्यवृत्तीसाठी पात्र खेळाडू-

राष्ट्रीय विजेतेपद - रोहिणी रमेश पाटील (डॉजबॉल १९ वर्षांआतील- एच.आर.पटेल महाविद्यालय, शिरपूर), कोमल नरेंद्र ढोले (फूटबॉल १७ वर्षांआतील- एच.आर. कन्या विद्यालय, शिरपूर), सचिन शंकरराव शिसोदे (डॉजबॉल-१९ वर्षांआतील, विकास विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, नरडाणा).

राष्ट्रीय उपविजेतेपद - शिवानी सुजित कुलकर्णी (योग १७ वर्षांआतील, कमलाबाई गर्ल्स हायस्कूल, धुळे)

सहभाग- आनंद संजय जगताप (क्रिकेट, आर.सी. पटेल इंग्लिश स्कूल, शिरपूर), मुद्रा प्रशांत अग्रवाल (बास्केटबॉल, कनोसा कॉन्व्हेंट स्कूल, धुळे), सुवर्णा पाटील (कराटे, कला व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय, धुळे), प्रतीक गजानन काटकर (कबड्डी, केएसके सिटी स्कूल, धुळे), इशा प्रीतम चौक (हॅण्डबॉल, कनोसा कॉन्व्हेंट स्कूल, धुळे), नीरज दिलीप चौधरी (तायक्वोंदो, जयहिंद हायस्कूल, धुळे), रुपाली रमेश खैरनार (जम्परोप, घोगरे कनिष्ठ महाविद्यालय, शिरपूर), रितेश अशोक सोनार (ज्युदो, न्यू सिटी स्कूल, धुळे), दीपक राजेंद्र ठाकरे (मैदानी स्पर्धा, बीबीएम मनपा हायस्कूल, शिरपूर), गोरख गंगाधर पवार (खो-खो, शासकीय विद्यानिकेतन, धुळे), पूनम चिंतामण चौरे (हॉकी, श्री छत्रपती शिवाजी सैनिकी शाळा, धुळे), अक्षरा सुनील जैन (तलवारबाजी, हस्ती पब्लिक स्कूल, दोंडाईचा)

| | |
|---|---|
| **Subject** | "Sport" News |
| **Publication** | "Lokmat" News Paper |
| **Date** | 15.01.2015 |
| **Page No.** | 12,Krida |

सकाळ

## गंगामाई फार्मसीत सेमिनार

नगाव (ता. धुळे) येथील गंगामाई इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीत नुकतेच 'इंटरव्ह्यू टेक्निक्स फॉर एमआर' व रोल ऑफ फार्मासिस्ट इन हेल्थ केअर' या विषयावर सेमिनार व पोस्टर सादरीकरण स्पर्धा झाली. मॅकलाइड फार्माचे विभागीय व्यवस्थापक सौरभ शर्मा व मालेगाव येथील एआयटी इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे डॉ. एन. एम. लोगडे यांनी मार्गदर्शन केले. दुपारी विद्यार्थ्यांसाठी झालेल्या पोस्टर सादरीकरण स्पर्धेचे संस्थेचे सचिव मनोहर भदाणे यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. प्राचार्य डॉ. व्ही. एम. शास्त्री, प्राचार्य आर. के. बेदमुथा, प्राचार्य एस. व्ही. चोरडिया उपस्थित होते. स्पर्धेत ३० विद्यार्थ्यांनी भाग घेतला. एच. आर. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीने प्रथम, गंगामाई इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीने द्वितीय, फागणे येथील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीने तृतीय क्रमांक मिळविला.

| | |
|---|---|
| **Subject** | "Seminar" News |
| **Publication** | "Sakal" News Paper |
| **Date** | 01.02.2015 |
| **Page No.** | 3, Dhule Zilha |

लोकमत

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी: २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, ०२२३०२३३४१०/४४३ फॅक्स: २२६९२१०२
E-Mail: dtedesk2@gmail.com Internet: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: २/एनजीसी/मान्यता/२०१५/१३४ दिनांक: २.०२.२०१५

## सन २०१५-१६ च्या मान्यता प्रक्रियेसाठी जाहीर सूचना

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करिता ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक २०१५-१६ मधील मार्गदर्शक सूचनांच्या आधारे ऑनलाईन पद्धतीने अर्ज दि. २०.०२.२०१५ पर्यंत मागविण्यात आलेले आहेत. परिषदेस सादर केलेल्या अर्जावर शासनाचे अभिप्राय परिषदेस सादर करण्याच्या अनुषंगाने संचालनालयाच्या संकेतस्थळावर माहिती भरण्याकरिता http://www.dtemaharashtra.gov.in/courseapproval2015/ ही लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. विद्यमान संस्थांनी त्यांचा डिटीई संकेतांक व पासवर्ड द्वारे लॉग इन करुन दि. ०६.०२.२०१५ पासून दि. २१.०२.२०१५ पर्यंत कागदपत्रांसह व्यक्तीश: उपस्थित रहावे. तसेच परिषदेस सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत संचालनालयाच्या अधिपत्याखालील विभागीय कार्यालयाकडे जमा करण्यात यावी.

नवीन तंत्र शिक्षण संस्था सुरू करणे, संस्थेचे स्थलांतरण, संस्था बंद करणे इ. बाबत ज्या संस्थांनी परिषदेस अर्ज/प्रस्ताव सादर केले असतील अशा संस्थांनी दि. २१.०२.२०१५ पर्यंत प्रस्तावाच्या प्रतीसह संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेशी संपर्क साधावा.

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून व्यावसायिक अभ्यासक्रमांना मान्यता देण्याबाबत शासनाने बृहत् आराखडा [Perspective Plan] तयार केला असून तो संचालनालयाच्या संकेतस्थळी उपलब्ध असून परिषदेस प्रस्ताव सादर करताना बृहत् आराखड्यामध्ये शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करिता उपलब्ध प्रवेशक्षमता विचारात घेण्यात यावी.

सही/-
(डॉ. सुभाष महाजन)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

| | |
|---|---|
| **Subject** | "AICTE" News |
| **Publication** | "Lokmat" News Paper |
| **Date** | 03.02.2015 |
| **Page No.** | 9,Rajya |

# पुण्य नगरी

## प्राचार्य डॉ.एस.बी. बारी यांचा आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभाग

शिरपूर : येथील एच.आर. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.बी.बारी यांनी दुबई येथे १३ व्या आंतरराष्ट्रीय औषध संशोधन परिषदेत सहभाग घेऊन शोधनिबंध सादर केला.



दुबई येथे दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत अनेक देशातील संशोधकांनी ९०० पेक्षा जास्त शोधनिबंध सादर केले. प्राचार्य डॉ.एस.बी.बारी यांनी 'क्वीनाझोलिन-थायाडायझोल फार्माकोफोर ॲज ॲंटिमायक्रोबियल एजंट' या विषयावर शोधनिबंध सादर केला. प्राचार्य डॉ.एस.बी.बारी यांनी तेथील एका सत्राचे अध्यक्षपद देखील भूषविले. प्राचार्य डॉ.एस.बी. बारी यांचे १३० शोधनिबंध विविध आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय नियतकालिकांमध्ये प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन झाले असून दोन पेटंटसाठी त्यांनी प्रस्ताव सादर केला आहे. प्राचार्य डॉ.एस.बी.बारी यांच्या आंतरराष्ट्रीय सहभागाबद्दल संस्थाध्यक्ष आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक डॉ.के.बी.पाटील यांनी कौतुक केले आहे.

| | |
|---|---|
| **Subject** | "International Conference" News |
| **Publication** | "Punyanagari" News Paper |
| **Date** | 12.02.2015 |
| **Page No.** | 3,Dhule (Gramian)Vruttaved |

# पटेल फार्मसी महाविद्यालयाचे चार विद्यार्थी गुणवत्ता यादीत



प्रियंका पाटील रूपाली पाटील तेजस्विनी पाटील मनिषा पाटील



तनिषा अग्रवाल शितल राजपूत शुभम जैन मिनाक्षी शर्मा

**शिरपूर :** उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे गेल्या डिसेंबर महिन्यात झालेल्या औषधनिर्माणशास्त्र पदवी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. त्यात येथील एच.आर. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्यूटिकल एज्युकेशन अँड रिसर्च महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे. महाविद्यालयातील निम्मेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

महाविद्यालयाचा अंतिम वर्ष बी. फार्मसीचा निकाल १०० टक्के लागला. प्रियंका विजय पाटील ८२.१ टक्के गुण मिळवून विद्यापीठात चौथी तर महाविद्यालयात प्रथम आली. रुपाली मोतीसिंग पाटील ८०.९ टक्के गुण मिळवून व्दितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली. सर्वेश शरद अग्रवाल ७६.३ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला. महाविद्यालयाचा तृतीय वर्ष बी. फार्मसीचा निकाल ९९ टक्के लागला. तेजस्वनी धनराज पाटील ८.६१ ग्रेड पॉइंट मिळवून विद्यापीठाच्या गुणवत्ता यादित चौथा क्रमांक मिळवून महाविद्यालयात प्रथम आली. मनीषा रावसाहेब पाटील ८.२५ ग्रेड पॉइंट मिळवून महाविद्यालयात दुसरी तर नूतन किशोर निकम ८.१८ ग्रेड पॉइंट मिळवून महाविद्यालयात तिसरी आली. महाविद्यालयाच्या व्दितीय वर्ष बी. फार्मसीचा निकाल ८७ टक्के लागला. तनिषा नीलकांत अग्रवाल ८.६४ सेमिस्टर ग्रेड पॉइंट एवरेज (एसजीपिए) गुण मिळवून विद्यापीठाच्या गुणवत्ता यादित तिसरी व महाविद्यालयात प्रथम आली. शीतल रवींद्र राजपूत ८.३६ एसजीपिए गुण मिळवून महाविद्यालयात व्दितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली. विक्रम लखीचंद जाधव व मीनल प्रमोद पाटील प्रत्येक ८.११ एसजीपिए गुण मिळवून संयुक्तपणे महाविद्यालयात तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. प्रथम वर्ष बी. फार्मसीचा पदवी अभ्यासक्रमाचा निकाल ९४ टक्के लागला. शुभम गौतमचंद जैन ८.५८ ग्रेड पॉइंट एवरेज गुण मिळवून विद्यापीठाच्या गुणवत्ता यादित दुसऱ्या व महाविद्यालयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला. मीनाक्षी रामनिवास शर्मा ७.९६ ग्रेड पॉइंट एवरेज गुण मिळवून महाविद्यालयात दुसरी आली. योगेश देवराम महाजन व जितेंद्र कैलास सोनवणे प्रत्येक ७.४६ ग्रेड पॉइंट एवरेज मिळवून संयुक्तपणे महाविद्यालयात तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थाध्यक्ष आमदार अमरिशभाई पटेल, नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपकार्याध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक डॉ. के. बी. पाटील, प्राचार्य डॉ. एस. बी. बारी, उपप्राचार्या प्रा. एस. डी. पाटील यांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांना डी. डी. पाटील, पी. ओ. पाटील, सी. जे. भावसार, पी. के. देशमुख, व्ही. के. चटप, डी. ए. पाटील, के. आर. पाटील, एल. आर. झवर, जी. बी. पाटील, आर. ई. मुथा, पी. एस. बाफना, सी. डी. सोनवणे, झेड. जी. खान यांचे मार्गदर्शन लाभले.

| | |
|---|---|
| **Subject** | "Result" News |
| **Publication** | "Punyanagari" News Paper |
| **Date** | 14.02.2015 |
| **Page No.** | 3,Dhule (Gramian)Vruttaved |

लोकमत

# आंतरराष्ट्रीय परिषदेत बारी यांचा सहभाग

धुळे : शिरपूर येथील एच.आर.पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अॅन्ड रिसर्चचे प्राचार्य डॉ.एस.बी.बारी यांनी दुबई येथे १३ व्या आंतरराष्ट्रीय औषध संशोधन परिषदेत सहभाग नोंदविला.

प्राचार्य डॉ.बारी यांचे सुमारे १३० शोधनिबंध विविध आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय संशोधन नियतकालिकात प्रसिद्ध झाले आहेत. या परिषदेत १००च्यावर शोधनिबंध सादर झाले.

डॉ.बारी यांनी या परिषदेत एका सत्राचे अध्यक्षपददेखील भूषविले. जगात संसर्गजन्य रोगांचे प्रमाण वाढत असून सर्वात जास्त मृत्यूही त्यामुळे होत आहे. अशा रोगांवर मात करण्यासाठी नवीन प्रभावी औषधाची गरज लक्षात घेऊन संशोधन केल्याचे त्यांनी परिषदेत सांगितले.

| | |
|---|---|
| Subject | “International Conference” News |
| Publication | “Lokmat” News Paper |
| Date | 18.02.2015 |
| Page No. | 02,Dhule nadurbar |

# पटेल फार्मसीला शोध प्रबंध स्पर्धेत पारितोषिक

**धुळे, दि.२५ (प्रतिनिधी)–**

शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित एच.आर. पटेल इंस्टिट्युट ऑफ फार्मास्यूटिकल एज्युकेशन अॅण्डरिसर्च महाविद्यालयाच्या पदव्युत्तर विभागातील फार्मासुटिक्स शाखेचा विद्यार्थी महेंद्र पाटील, प्रा.प्रशांत देशमुख तसेच क्वालिटी अश्यूरन्सशाखेचा विद्यार्थी नयनदीप गिरासे, डॉ. प्रवीण पाटील यांनी सादर केलेले शोधप्रबंधाची निवड राष्ट्रीय उत्कृष्ट शोधप्रबंध स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी आहे.

ट्रोईक फार्मासुटिकल्स लिमिटेड, अहमदाबाद यांच्या वतीने उत्कृष्ट पदव्युत्तर शोधप्रबंधासाठीची रनजीभाई व्ही. पटेल पारितोषिक स्पर्धा प्रत्येक वर्षी घेतली जाते. सदर पारितोषिक स्पर्धेचे नाव यापूर्वी महाविद्यालयांचे फार्मासुटिक्स विभागप्रमुख प्रा.प्रशांत देशमुख यांनी मार्गदर्शन केलेल्या शोधप्रबंधाला संदर स्पर्धेत पारितोषिक मिळाले आहे.

सदर स्पर्धेत भारतातील विविध औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील सुमारे २०० च्या वर विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यापैकी प्रत्येक विषयातून पाच विद्यार्थ्यांची निवड अंतिम फेरीसाठी झाली आहे. महाविद्यालयातील विद्यार्थी नयनदीप गिरासे व महेंद्र पाटील यांनी सादर केलेल्या शोधप्रबंधाचे नामांकन अंतिम फेरीसाठी झाले आहे. ग्राफिन नॅनोशीट अँज पोटेन्शियल वुन्ड ड्रेसिंग मटेरिअल हा महेंद्र पाटील व प्रा.प्रशांत देशमुख यांच्या संशोधनाचा विषय होता. नयनदीप गिरासे व डॉ.प्रवीण पाटील यांनी ग्रीन सिंथेसिस ऑफ ग्राफिन बायोसेन्सर फोर डायग्नोस्टिक अप्लिकेशन या विषयावर शोधप्रबंध सादर केला. अंतिम फेरीसाठी निवड झालेल्या स्पर्धकांपैकी एकूण पाच स्पर्धकांना प्रत्येक विषयातून प्रथम क्रमांकाचे बक्षीस देण्यात येणार आहे. प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला ५१,००० रु. रोख रक्कम व प्रमाणपत्र तसेच मार्गदर्शक प्राध्यापकास २५००० रु. रोख रक्कम व प्रमाणपत्र असे या पारितोषिकाचे स्वरुप आहे. महाविद्यालयाच्या डॉ.पी.ओ. पाटील व प्रा.पी.के. देशमुख यांचे विविध शोधनिबंध आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय दर्जाच्या संशोधन नियतकालिकात प्रकाशीत झाले असून त्यांना यापूर्वी संशोधनासाठी आर्थिक सहाय्य प्राप्त झालेले आहे. सदर यशाबद्दल विद्यार्थी व शिक्षकांचे कौतुक आ.अमरिशभाई पटेल, नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपकार्याध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक डॉ.के.बी. पाटील, प्राचार्य डॉ.एस.बी. बारी, उपप्राचार्य प्रा.सौ. एस.डी. पाटील यांनी केले.

| | |
|---|---|
| **Subject** | "Students Achievement" News |
| **Publication** | "Deshdoot" News Paper |
| **Date** | 22.02.2015 |
| **Page No.** | 11,Dhule nadurbar |

www.esakal.com
सकाळ

हवी
परिसंवाद



गोरे, राजगोपाल भंडारी,
बारी आदी.

महा.) यांनी अनुक्रमे
क्रमांक मिळवला.

# रोगप्रतिबंधासाठी गुणवत्तापूर्ण औषधांची निर्मिती हवी

## डॉ. नितीन गोरे : शिरपूरच्या पटेल फार्मसी महाविद्यालयात राष्ट्रीय परिसंवाद

शिरपूर, ता. ५ : बदलत्या वातावरणानुसार रोग निर्माण करणारे जिवाणू व विषाणू स्वतःच्या रचनेत बदल घडवतात. त्यांना रोखण्यासाठी नवीन व गुणवत्तापूर्ण औषधांची निर्मिती आवश्यक आहे. याकामी जैवतंत्रज्ञान आणि सूक्ष्म तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग औषधनिर्मात्यांनी करावा, असे प्रतिपादन पुणे येथील एमक्युअर फार्माचे उपाध्यक्ष डॉ. नितीन गोरे यांनी केले.

येथील एच. आर. पटेल फार्मसी महाविद्यालयात राष्ट्रीय परिसंवादात औषधनिर्माण क्षेत्रातील नावीन्यपूर्ण संकल्पना व पद्धती या विषयावर डॉ. गोरे ... भंडारी अध्यक्षस्थानी होते. असोज सॉफ्टकॅप्सचे (बडोदा) उपाध्यक्ष भावीन सावला, सायंफाईडर कंपनीच्या कार्यकारी अध्यक्षा रिमा वैद्य, बारडोली येथील मालिबा महाविद्यालयाचे डॉ. केतन रांच, उमविच्या औषध तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. व्ही. जे. मोकळे, माजी कुलगुरू डॉ. के. बी. पाटील, प्राचार्य डॉ. एस. जे. सुराणा, डॉ. एस. बी. बारी, डॉ. एस. डी. पाटील उपस्थित होते.

डॉ. पाटील म्हणाले, की औषधनिर्माणशास्त्रातील संशोधनामुळे देशात क्षयरोग व उच्च रक्तदाबामुळे ... उत्तम आरोग्य देणाऱ्या किफायतशीर औषधांचे संशोधन करण्यावर विद्यार्थी, संशोधकांनी भर द्यावा. डॉ. गोरे यांच्या हस्ते महाविद्यालयातील सूक्ष्म तंत्रज्ञान विभागाचे उद्घाटन झाले. समन्वयक पी. के. देशमुख यांनी परिसंवादाची भूमिका मांडली. डॉ. पी. ओ. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. सी. डी. सोनवणे यांनी आभार मानले.

विद्यार्थ्यांसाठी फार्मान्वेषण २०१५ संशोधन पारितोषिक स्पर्धा झाली. तीत १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेत ६९ पोस्टर प्रदर्शित केले. फार्मास्युटिकल्स विषयात प्रशांत पाटील व नंदलाल ...



शिरपूर : पटेल महाविद्यालयात राष्ट्रीय परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. नितीन गोरे, राजगोपाल भंडारी, भावीन सावला, रिमा वैद्य, डॉ. के. बी. पाटील, प्राचार्य सुराणा, डॉ. एस. बी. बारी आदी.

... विषयात अलेक्झांडर सॉलोमन व प्रतिमा कोकरे (लोणावळा), अभिषेक ... बाफना व भावना चौधरी (शिरपूर), फार्मास्युटिकल केमिस्ट्रीत निशा ... (साकेगाव महा.) यांनी अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवला ...

| | |
|---|---|
| Subject | "Seminar(ICMPR)" News |
| Publication | "Sakal" News Paper |
| Date | 06.03.2015 |
| Page No. | 04,Dhule ZIlha |

सुनील साळुंखे



शिरपूर येथे सूक्ष्मतंत्रज्ञान विभागाचे उद्घाटन करताना प्रा. नितीन गोरे. डावीकडून संस्थेचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, प्रा.के.बी. पाटील, प्रा.संजय सुराणा, प्रा.संजय बारी, प्रा.एस.डी. पाटील, भावीन सावला.

महाराष्ट्राचा मानबिंदू
लोकमत

# सूक्ष्म तंत्रज्ञानामुळे अचूक निदान

## नितीन गोरे : शिरपूर येथील एच.आर. पटेल फार्मसीत परिसंवाद

शिरपूर : सूक्ष्मतंत्रज्ञानामुळे भविष्यात अनेक असाध्य आजारांवर प्रभावीपणे मात करणारी औषधे निर्माण होऊ शकतात. आधुनिक युगात, माहिती व तंत्रज्ञान, आरोग्य, जलशुद्धीकरण, शेती, फलोत्पादन व औषधनिर्माण या क्षेत्रात सूक्ष्म तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे. पारंपरिक औषधनिर्माण पद्धतीपेक्षा सूक्ष्मतंत्रज्ञानाने बनविलेली औषधी ही उपचार क्षेत्रात वरदान ठरू शकते, असे प्रतिपादन पुणे येथील नॅनोटेक्नोलॉजी फार्मास्युटिकल कंपनीचे उपाध्यक्ष डॉ.नितीन गोरे यांनी केले.

येथील एच.आर. पटेल इस्टिट्यूट ऑफ फॉर्मास्युटिकल महाविद्यालयात परिसंवाद व सूक्ष्मतंत्रज्ञान विभागाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी संस्थेचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, माजी कुलगुरू प्रा.के.बी. पाटील, प्राचार्य प्रा.एस.जे. सुराणा, प्राचार्य प्रा.एस.बी. बारी, प्रा.एस.डी. पाटील, पी.के देशमुख, व्ही.के चटप, बडोदा येथील भावीन सावला, पुण्याच्या रिमा वैद्य, बारडोलीचे डॉ.केतन रांच, डॉ.व्ही.जे. मोकळे आदी उपस्थित होते.

डॉ.नितीन गोरे म्हणाले, आजच्या युगात नॅनोटेक्नोलॉजी म्हणजेच अति सूक्ष्मतंत्रज्ञानाचा उपयोग विविध क्षेत्रात केला जात आहे. अति सूक्ष्मतंत्रज्ञानाचा उपयोग करून तयार केलेल्या औषधी अधिक प्रभावीपणे शरीरावर परिणाम करतात.

राजगोपाल भंडारी म्हणाले, भारतातील तरुणाई व विद्यार्थ्यांच्या नावीन्यपूर्ण संकल्पना हे जगातील सर्वात मोठे संसाधन असून त्याचा परिणाम देशाच्या विकासावर होत असल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे तितकेच महत्त्वाचे आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी कोणताही न्यूनगंड न ठेवता संशोधनासाठी पुढे आले पाहिजे. नवीन व गुणवत्तापूर्ण औषधींच्या निर्मितीसाठी जीवतंत्रज्ञान व सूक्ष्मतंत्रज्ञानाचा उपयोग करून औषध निर्मात्यांनी प्रभावी औषधे तयार करणे काळाची गरज आहे.

माजी कुलगुरू डॉ.के बी. पाटील म्हणाले, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी सकारात्मक दृष्टिकोनातून आत्मविश्वासाने आरोग्य क्षेत्रातील सर्जनशील संकल्पना मांडल्यास चांगल्या कंपन्या नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध करून देतात. औषधनिर्माण शास्त्रातील संशोधनामुळे भारतातील क्षयरोग व उच्चरक्तदाब यामुळे होणाऱ्या मृत्यूचा दर कमी झाला आहे. औषधनिर्माण कंपन्या या जगातील संशोधनयुक्त व आरोग्यदायी उद्योगसमूह आहेत. आत्मविश्वास व संभाषण कौशल्य ही विद्यार्थी जीवनात यशस्वी होण्याची गुरुकिल्ली आहे.

### पोस्टर प्रदशर्नात ६९ विद्यार्थ्यांचा सहभाग

घेण्यात आलेल्या संशोधन स्पर्धेत ६९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्यात फॉमस्युटिक्समध्ये प्रशांत पाटील व नंदलाल पाटील चोपडा, अपूर्व ढवळे जामनेर, फॉमकॉलॉजीमध्ये आलेक्झांडर सोलोमन व प्रतिमा कोकरे लोणावळा, अभिषेक चव्हाण व नवीन अतांनी मंडलेश्वर, फॉर्माकोगनोसीमध्ये रुचिता बाफना व भावना चौधरी शिरपूर, मुस्तफा दारुवाला लोणावळा तर फॉमस्युटिकल केमेस्ट्रीमध्ये निशा पाटीदार व भावना गुजराथी मंडलेश्वर, मुकेश भोळे व विश्वास मोरे साकेगाव यांनी अनुक्रमे क्रमांक मिळवले. विजेत्यांना रोख रक्कम, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

| | |
|---|---|
| Subject | "Seminar(ICMPR)" News |
| Publication | "Lokmat" News Paper |
| Date | 09.03.2015 |
| Page No. | 02,Dhule ZIlha |



Department of Library,
H. R. Patel Institute of Pharmaceutical
Education & Research, Shirpur

पुण्यनगरी

# नॅनो टेक्नॉलॉजीचा वापर वाढवून संशोधन करावे : डॉ.नितीन गोरे

**शिरपूर : जगभरात नॅनो टेक्नॉलॉजीचा उपयोग सर्वच क्षेत्रात मोठ्या प्रमाणात केला जात आहे. यामुळे तयार केलेल्या औषधी अधिक प्रभावीपणे काम करतात. महाविद्यालयाने उभारलेला अतिसूक्ष्म तंत्रज्ञानाचा विभाग हा अतिशय अद्ययावत व सुसज्ज असून प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घेतला पाहिजे. योग्य ते उच्च प्रतीचे संशोधन सर्वांनी करावे, असे आवाहन डॉ.नितीन गोरे यांनी केले.**



शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित एच.आर. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च महाविद्यालयात अतिसूक्ष्म तंत्रज्ञान विभागाचे उद्घाटन, एकदिवसीय राष्ट्रीय परिसंवाद तसेच बी.फार्मसी विद्यार्थ्यांसाठी फार्मविन्शन-२०१५ ही संशोधन पारितोषिक स्पर्धा असे विविध कार्यक्रम घेण्यात आले.

एच.आर.पटेल फार्मसी महाविद्यालयातर्फे उभारण्यात आलेल्या नॅनोटेक्नॉलॉजी (अतिसूक्ष्म तंत्रज्ञान) विभागाचे उद्घाटन एमक्यूअर फार्मास्युटीकल प्रा.लि. पुणे येथील वरिष्ठ उपाध्यक्ष डॉ.नितीन गोरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक डॉ.के.बी. पाटील, आर. सी. पटेल फार्मसीचे प्राचार्य डॉ.संजय सुराणा, एच.आर.पटेल फार्मसीचे प्राचार्य डॉ.संजय बारी, उपप्राचार्या डॉ.एस.डी.पाटील, प्रा.पी.के.देशमुख, प्रा.व्ही.के.चटप आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यानंतर आयोजित करण्यात आलेल्या एकदिवसीय राष्ट्रीय परिसंवादाचे उद्घाटन डॉ.नितीन गोरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून असोज सॉफ्टकॅप्स प्रा.लि.बडोदा येथील उपाध्यक्ष भाविन सावला, साय-एज कंपनी, पुणे येथील रिमा वैद्य, मालिबा फार्मसी कॉलेज, बारडोलीचे डॉ.केतन रांच, उमविचे औषध तंत्रज्ञान विभागप्रमुख डॉ.व्ही.जे. मोकळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय बारी आदी उपस्थित होते. औषधनिर्माण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण संकल्पना व पद्धती या विषयावर परिसंवाद घेण्यात आले. यासाठी महाराष्ट्रासह मध्यप्रदेश, गुजरात येथील ३५० पेक्षा जास्त विद्यार्थी व शिक्षकांनी सहभाग नोंदविला.

| | |
|---|---|
| **Subject** | "Seminar(ICMPR)" News |
| **Publication** | "Punyanagari" News Paper |

| | |
|---|---|
| **Date** | 10.03.2015 |
| **Page No.** | 03,Dhule Gramin |

# नॅनो टेक्नॉलॉजीचा वापर वाढवून संशोधन करा - डॉ.नितीन गोरे

## एच.आर.पटेल फार्मसी महाविद्यालयात विविध कार्यक्रम

शिरपूर, दि.९ –

जगभरात नॅनो टेक्नॉलॉजीचा उपयोग सर्वच क्षेत्रात वापर मोठ्या प्रमाणात केला जात आहे. यामुळे तयार केलेल्या औषधी अधिक प्रभावीपणे काम करतात. महाविद्यालयाने उभारलेला अतिसूक्ष्म तंत्रज्ञानाचा विभाग हा अतिशय अद्ययावत व सुसज्ज असून प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे सांगून योग्य ते उच्च प्रतीचे संशोधन सर्वांनी करावे असे आवाहन डॉ.नितीन गोरे यांनी केले.

शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित एच.आर.पटेल इंस्टीट्युट ऑफ फार्मास्युटीकल एज्युकेशन अ‍ॅण्ड रीसर्च महाविद्यालयात अतिसूक्ष्म तंत्रज्ञान विभागाचे उद्घाटन, एकदिवसीय राष्ट्रीय परीसंवाद तसेच बी.फार्मसी विद्यार्थ्यांसाठी



शिरपूर येथील एच.आर.पटेल फार्मसी महाविद्यालयात राष्ट्रीय परिसंवादाचे उद्घाटन करतांना डॉ.नितीन गोरे सोबत संस्थेचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक डॉ.के.बी. पाटील, आर.सी.पटेल फार्मसीचे प्राचार्य डॉ.संजय सुराणा, एच.आर.पटेल फार्मसीचे प्राचार्य डॉ.संजय बारी आदी.

फार्मवेन्शन–२०१५ ही संशोधन पारितोषिक स्पर्धा असे विविध कार्यक्रम घेण्यात आले.

एच.आर.पटेल फार्मसी महाविद्यालयातर्फे उभारण्यात आलेल्या नॅनो टेक्नॉलॉजी (अतिसूक्ष्म तंत्रज्ञान) विभागाचे उद्घाटन एमक्यूआर फार्मास्युटीकल प्रा.लि. पुणे येथील वरीष्ठ उपाध्यक्ष डॉ.नितीन गोरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक डॉ.के.बी.पाटील, आर.सी.पटेल फार्मसीचे प्राचार्य डॉ.संजय सुराणा, एच.आर. पटेल फार्मसीचे प्राचार्य डॉ. संजय बारी, उपप्राचार्या डॉ. एस.डी.पाटील, प्रा.पी.के. देशमुख, प्रा.व्ही.के.चंटप आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यानंतर आयोजित करण्यात आलेल्या एकदिवसीय राष्ट्रीय परिसंवादाचे उद्घाटन डॉ.नितीन गोरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून असोज सॉफ्टकॅप्स प्रा.लि.बडोदा येथील उपाध्यक्ष भावीन सावला, साय–एज कंपनी, पुणे येथील रीमा वैद्य, मालिबा फार्मसी कॉलेज,, बारडोलीचेडॉ.केतन रांच, उमविचे औषध तंत्रज्ञान विभागप्रमुख डॉ.व्ही.जे.मोकळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय बारी आदी उपस्थित होते. औषधनिर्माण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण संकल्पना व पद्धती या विषयावर परिसंवाद घेण्यात आले. यासाठी महाराष्ट्रासह म.प्र., गुजराथ येथील ३५० पेक्षा जास्त विद्यार्थी व शिक्षकांनी सहभाग नोंदविला.

| | |
|---|---|
| **Subject** | **"Seminar(ICMPR)" News** |
| **Publication** | **"Deshdoot" News Paper** |

| | |
|---|---|
| **Date** | **10.03.2015** |
| **Page No.** | 10,Dhule News |

# NEWS PAPER CLIPING
# (News & Advertisements )

[Year]
2014-15

लोकमत
महाराष्ट्राचा मानबिंदू



## शिरपूर येथे मुलींना कराटे प्रशिक्षण

शिरपूर : शहरातील आर.सी. पटेल व एच.आर. पटेल महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी स्वसंरक्षणार्थ कराटेचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणाचे उद्घाटन प्राचार्य डॉ.डी.आर. पाटील यांच्या हस्ते झाले. उपप्राचार्य ए.जी. सोनवणे, डी.के. पाटील, डॉ.अनिता जाधव, अनिता मोरे, राजश्री चौधरी, वंदना पाटील, योगिता साळवे, योगिता पाटील आदी उपस्थित होते. कराटे प्रशिक्षणामुळे आत्मविश्वास वाढतो. अशा प्रकारचे प्रशिक्षण आवश्यक आहे. यामुळे स्वयंसिद्धा अभियानाचे उद्दिष्ट सफल झाल्याचे डॉ.डी.आर. पाटील यांनी मार्गदर्शन करताना सांगितले. प्रशिक्षक आकाश पंडित यांनी कराटेची प्रात्यक्षिके दाखविली.

| | |
|---|---|
| **Subject** | "Karate" News |
| **Publication** | "lokmat" News Paper |

| | |
|---|---|
| **Date** | 05.03.2015 |
| **Page No.** | 03,Dhule News |

## पटेल फार्मसीत व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा

शिरपूर, ता. २४ : येथील एच. आर. पटेल फार्मसी महाविद्यालयात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सहकार्याने व्यक्तिमत्त्व विकासावर कार्यशाळा झाली. प्राचार्य डॉ. एस. बी. बारी अध्यक्षस्थानी होते. उपप्राचार्या डॉ. एस. डी. पाटील उपस्थित होत्या. नैतिक मूल्ये-यशाची गुरुकिल्ली या विषयावर नंदुरबार येथील प्रा. डॉ. माधवराव कदम, मूल्यशिक्षण काळाची गरज या विषयावर डॉ. फुला बागूल, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी यशाचा मार्ग या विषयावर डॉ. प्रिया कुरकुरे यांनी मार्गदर्शन केले. प्रा. आर. ई. मुथा यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. वाय. बी. ठाकूर यांनी आभार मानले.

| | |
|---|---|
| **Subject** | "Personality Development" News |
| **Publication** | "Sakal" News Paper |
| **Date** | 25.03.2015 |
| **Page No.** | 03,Dhule Zilha |

लोकमत
महाराष्ट्राचा मानबिंदू

# महिला फार्मसीत कार्यशाळा

शिरपूर : येथील एच.आर.पटेल फार्मसी महाविद्यालयात व्यक्तिमत्त्व विकासावर एक दिवसाची कार्यशाळा नुकतीच घेण्यात आली. एच.आर. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल व उमवि यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. यावेळी डॉ.फुला बागुल यांनी मूल्यशिक्षण काळाची गरज, डॉ.प्रिया कुरकुरे यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी उज्ज्वल यशाचा मार्ग तर डॉ.एम.के.कदम यांनी नैतिक मूल्ये यशाची गुरुकिल्ली या विषयावर मार्गदर्शन केले. या व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळेत खान्देशातील ६४ विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला. यावेळी प्राचार्य डॉ.एस.बी. बारी, उपप्राचार्या डॉ.एस. डी. पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.आर.ई. मुथा यांनी केले.

| | |
|---|---|
| **Subject** | "Personality Development" News |
| **Publication** | "Lokmat" News Paper |
| **Date** | 04.04.2015 |
| **Page No.** | 02,Dhule Zilha |

पुण्य नगरी

# पटेल फार्मसीत व्यक्तिमत्त्व विकासावर कार्यशाळा




शिरपूर : शिरपुर एज्युकेशन सोसायटी संचलित एच.आर. पटेल इन्स्टिट्युट ऑफ फार्मास्यूटिकल एज्युकेशन अँड. रिसर्च महाविद्यालय व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांच्या संयुक्त विद्यमानाने व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर एकदवसीय कार्यशाळा झाली.

कार्यक्रमाच्या उद्घाटनासाठी नंदूरबार येथील जी. टी. पाटील महाविद्यालयाचे डॉ. माधव कदम, एस. पी. डी. एम. महाविद्यालयातील डॉ. फुला बागुल, आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या डॉ. प्रिया कुरकुरे, प्राचार्य डॉ. एस. बी. बारी, उपप्राचार्या डॉ. एस. डी. पाटील, प्रा. आर. ई. मुथा उपस्थित होते. कार्यशाळेत एच. आर. पटेल फार्मसी महाविद्यालय, आर. सी. पटेल फार्मसी महाविद्यालय, आय. एम. आर. डी. महाविद्यालय व आर. सी. पटेल कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या एकूण ६४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. सुत्रसंचालन प्रा. आर. ई. मुथा व आभार प्रदर्शन प्रा. वाय. बी. ठाकूर यांनी केले.

| | |
|---|---|
| **Subject** | "Personality Development" News |
| **Publication** | "Punyanagari" News Paper |
| **Date** | 05.04.2015 |
| **Page No.** | 02,Dhule Gramin |

दैनिक दिव्य मराठी

# शिरपूर - पटेल महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे प्रवेश परीक्षेमध्ये यश



येथील एच. आर. पटेल फार्मसी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी एम. फार्मसीला प्रवेश घेण्यासाठी द्याव्या लागणाऱ्या परीक्षेत यश मिळविले. राष्ट्रीय स्तरावर झालेल्या या परीक्षेला देशभरातून २५ हजार विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यातील दोन हजार ७०० विद्यार्थी ही परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. त्यात पटेल फार्मसीच्या सर्वेश अग्रवाल, रूपाली पाटील, रोहिणी वारुडे, सुशील जाधव व नेहा चालसे या पाच विद्यार्थ्यांचा समावेश आहे. त्यांना संस्थाध्यक्ष आमदार अमरिश पटेल, भूपेश पटेल, राजगोपाल भंडारी, डॉ. के. बी. पाटील, प्राचार्य डॉ. एस. बी. बारी,उपप्राचार्या प्रा. एस. डी. पाटील यांचे मार्गदर्शन लाभल्याचे कळविण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| **Subject** | "GPAT-15" News |
| **Publication** | "Divyamarathi" News Paper |
| **Date** | 07.04.2015 |
| **Page No.** | 03,Jalgaon |

पुण्य नगरी

# एच.आर. पटेल फार्मसीच्या विद्यार्थ्यांचे यश



**शिरपूर :** येथील एच.आर. पटेल औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर औषधनिर्माणशास्त्र शाखेत प्रवेशासाठी झालेल्या राष्ट्रीय जीपॅट २०१५ परीक्षेत यश प्राप्त केले आहे.

जीपॅट परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्तेच्या आधारे औषधनिर्माणशास्त्र पदव्युत्तर अभ्यासक्रमाला (एम. फार्मसीला) प्रवेश दिला जातो. परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे विद्यार्थ्यांना दरमहा १२४०० रुपये शिष्यवृत्तीदेखील मिळणार आहे. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेतर्फे ही परीक्षा दि. २३ व २४ फेब्रुवारी २०१५ दरम्यान संपूर्ण भारतात विविध केंद्रावर ऑनलाइन पध्दतीने घेण्यात आली होती. एच. आर. पटेल फार्मसी महाविद्यालयातील पाच विद्यार्थी या परीक्षेत यशस्वी झाले आहेत. महाविद्यालयातील सर्वेश अग्रवाल, रुपाली पाटील, रोहिणी वारुडे, सुशील जाधव, नेहा चालसे यांनी राष्ट्रीय स्तरावर अनुक्रमे १३७८, १७००, १७००, २२०० व २५४२ या क्रमांकाचे मानांकन प्राप्त केले आहे. जीपॅट परीक्षेसाठी वर्षभर जादा तासिका व प्रत्येक आठवड्यात घेतलेल्या सराव परीक्षांमुळेच हे यश साध्य झाल्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. बारी यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांना प्रा.एस. डी. पाटील, डी.डी. पाटील, पी. ओ. पाटील, सी. जे. भावसार, पी. के. देशमुख, व्ही. के. चटप, डी. ए. पाटील, के. आर. पाटील, एल. आर. झवर, जी. बी. पाटील, आर. ई. मुथा, पी. एस. बाफना, सी. डी. सोनवणे, झेड. जी. खान आदींचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थाध्यक्ष आमदार अमरिशभाई पटेल, नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, संचालक डॉ. के. बी. पाटील, प्राचार्य डॉ. एस. बी. बारी, उपप्राचार्या प्रा. एस. डी. पाटील यांनी कौतुक केले.

| | |
|---|---|
| **Subject** | "GPAT-15" News |
| **Publication** | "Punyanagari" News Paper |
| **Date** | 07.04.2015 |
| **Page No.** | 04,Dhule |